**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, जि.अहमदनगर येथील भौतिकोपचार पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या (M.P.Th) प्रवेशक्षमतेत वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांकः एमईडी १०१९/प्र.क्र.२९३/१९/शिक्षण-२

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१

दिनांक : ०३ नोव्हेंबर, २०२०

**वाचा** : १)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र . संवैशिवसं/पीजी/प्रइऑमेसा/अभिपूर्ण/एमपीटीएच/सक्षमता तपासणी/पीजी-१५/२०१८/२-अ, दिनांक १५/०७/२०२०

२)कुलसचिव,प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ) पिआयएमएस/सीओपीटी/२०१९/३३७,, दिनांक ०९/०८/२०१९

**प्रस्तावना:**

प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस या अभिमत विद्यापीठांतर्गत डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लोणी, ता.राहता,जि.अहमदनगर या संस्थेतील M.P.Th(Musculoskeletal Sciences) , M.P.T(Neurosciences), M.P.Th(Cardio -Respiratory Physiotheraphy), M.P.Th(Community Based Rehabiliation) आणि M.P.Th(Paediatrics Physiotheraphy) या भौतिकोपचार पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता वाढ करण्याचा प्रस्ताव संदर्भ क्र. २ वरील पत्रान्वये उक्त विद्यापीठाकडून शासनास प्राप्त झाला होता. त्यानुसार सदरहू संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालकांनी सक्षमता तपासणी अहवाल संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यांनी उक्त संस्थेतील भौतिकोपचार पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्याची शिफारस केली आहे. सदर शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयात पदव्युत्तर भौतिकोपचार अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता वाढ करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन शासन याद्वारे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लोणी, ता.राहता,जि.अहमदनगर या संस्थेतील खालील नमूद भौतिकोपचार पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून वाढ करण्यास मान्यता देत आहे:.

| अ.क्र. | विषय/अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | M.P.Th-Musculoskeletal Sciences | ०२ वरुन ०६ |
| २ | M.P.Th-Neurosciences | ०२ वरुन ०६ |
| ३ | M.P.Th-Cardio Respiratory Physiotheraphy | ०२ वरुन ०५ |
| ४ | M.P.Th-Community Based Rehabiliation | ०२ वरुन ०५ |
| ५ | M.P.Th-Paediatrics Physiotheraphy | ०२ वरुन ०३ |

(कृ.मा.प)

Shot on OnePlus

२. उपरोक्त मान्यता ही पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहिल:-

१) उक्त महाविद्यालयातील नमूद पाच M.P.Th अभ्यासक्रमांसाठी प्रवेशक्षमता ही तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे इतकी राहिल.

२) राज्य शासन, केंद्रशासन, मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३) राज्य शासनाने तसेच विद्यापीठाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुटस् (प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) संस्थेने उपरोक्त भौतिकोपचार महाविद्यालयास प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, लोणी, ता.राहता,जि.अहमदनगर या अभिमत विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

६) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

७) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे , त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

८) शासकीय वैद्यकीय/भौतिकोपचार किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

९) प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीट) यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापुर्वी संस्था विहित मानकांची पुर्तता करीत आहे याची खात्री करावी.

सदर आदेश महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( अजित सासुलकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
कुलसचिव, प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस (अभिमत विद्यापीठ), लोणी, ता.राहता,जि.अहमदनगर
प्राचार्य, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लोणी, ता.राहता,जि.अहमदनगर
निवडनस्ती (शिक्षण-२)